।। सा विद्या या विमुक्तये ।।

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with "B ++" Grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE REGISTRAR** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: registrar@srtmun.ac.in


जा.क्र.आस्था/०२/२०२५-२६/९३ दिनांक: ३० जुलै, २०२५

ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती मार्फत ग्रीन ऑडीट, पर्यावरण ऑडीट, गुणवत्ता ऑडिट करून घेण्याबाबत...

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये सर्व प्राचार्य, संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठामार्फत संलग्न महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थांना ग्रीन ऑडीट, पर्यावरण ऑडीट, गुणवत्ता ऑडिट इत्यादी संदर्भाने कन्सल्टन्सी च्या माध्यमातून सशुल्क सेवा पुरविण्याचे ठरविले आहे.

त्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय आणि इतर शैक्षणिक संस्थांनी सोबत जोडलेल्या निर्देश/मार्गदर्शिकेप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठाने गठित केलेल्या ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती मार्फत ग्रीन ऑडीट, पर्यावरण ऑडीट, गुणवत्ता ऑडिट करून घ्यावे. सदर ऑडिट ऐच्छिक स्वरूपाचे आहे.

(प्रा.(डॉ.)ज्ञानेश्वर दा. पवार)
प्र.कुलसचिव

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

प्रत:

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) अध्यक्ष/सदस्य, ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहितीस्तव:

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

# ग्रीन ऑडिट, पर्यावरण ऑडिट, ऊर्जा ऑडिट आणि गुणवत्ता ऑडिट
## नियमावली - २०२५

प्रस्तुत परिपत्रकाव्दारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड शी संलग्नित सर्व महाविद्यालय आणि इतर सर्व शैक्षणिक संस्थांना विविध प्रकारचे ऑडिट (लेखापरीक्षण), जसे की, ग्रीन ऑडिट, पर्यावरण ऑडिट, ऊर्जा ऑडिट, गुणवत्ता ऑडिट इत्यादी सशुल्क सेवा-सुविधा पुरविण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने व मार्गदर्शनाखाली ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समितीचे गठन केलेले आहे.

या समितीकडून आपल्या महाविद्यालयाचे / शैक्षणिक संस्थेचे ग्रीन ऑडिट, पर्यावरण ऑडिट, ऊर्जा ऑडिट गुणवत्ता ऑडिट इत्यादी ऑडिट करून घेता यावे, यास्तव विद्यापीठाच्या कन्सल्टन्सी सेवा धोरणानुसार (As per the University Consultancy Policy) कमीत-कमी दरात तत्सम विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, पाणी व ऊर्जा व्यवस्थापन, हरित कॅम्पस अशा महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश आहे.

नॅकने त्यांच्या परिपत्रक क्रमांक १४-२९/२०२२ दि. २६ मे २०२२ द्वारे ग्रीन ऑडिट, पर्यावरण ऑडिट, ऊर्जा ऑडिट आणि गुणवत्ता ऑडिटसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केलेली आहेत. यु.जी.सी., नॅक, एन.आय.आर.एफ, इतर महत्वाच्या संबंधित संस्थांसाठी विविध उद्देशांसाठी / कारणांसाठी श्रेणीकरण / गुणानुक्रम करणे, दिवसेंदिवस अनिवार्य होत चालले आहे. त्यातीलच अत्यंत महत्वाचा भाग म्हणून सदरच्या सर्व ऑडिट्स कडे आज पाहिले जात आहे. त्यामुळे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय आणि इतर शैक्षणिक संस्थांनी सदर परिपत्रकाव्दारे मान्यता दिलेल्या समितीकडून संबंधीत ऑडिटची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी.

त्यासंबधीची माहिती पुढीलप्रमाणे -

### अ) समिती सदस्य, ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती

| ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | सदस्य |
| डॉ. अविनाश कदम<br>प्राध्यापक,<br>भूशास्त्र संकुल,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.<br>मोबाईल : ९९ ७५ ८३४ ७३४<br>ई-मेल: askadam505@gmail.com | डॉ. योगेश लोळगे<br>सहयोगी प्राध्यापक,<br>भूशास्त्र संकुल,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.<br>मोबाईल : ९५ ५२ ५४५ २४८<br>ई-मेल: lolage.yogesh@gmail.com | डॉ. काशिनाथ बोगले<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>भौतिकीयशास्त्र संकुल,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.<br>मोबाईल : ७३ ५० ८४५ ८२७<br>ई-मेल: kashinath.bogle@gmail.com |

**ब) ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी अंतर्गत येणाऱ्या सेवांचा तपशील**

सदर समितीकडून यु.जी.सी., नॅक, एन.आय.आर.एफ., इतर महत्वाच्या संस्थांच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ग्रीन ऑडिट, पर्यावरण ऑडिट, ऊर्जा ऑडिट आणि गुणवत्ता ऑडिट केले जाईल. यामध्ये घनकचरा, पाणी व ऊर्जा नियोजन - व्यवस्थापन, हरित कॅम्पस अशा महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश करण्यात येईल. आपल्या महाविद्यालयाचे / संस्थेचे श्रेणीकरण / गुणानुक्रम यामध्ये गुणात्मक वाढ होण्याकरीता वेळोवेळी मार्गदर्शन केले जाईल. सदर ऑडिटचे वर्ष हे महाविद्यालयाच्या सोयीचे, महाविद्यालयाच्या नॅकच्या चक्र-कालावधीप्रमाणे किंवा शैक्षणिक वर्षाप्रमाणे राहील. सदरच्या ऑडिट प्रक्रियेत येणाऱ्या ग्रीन ऑडिट, पर्यावरण ऑडिट, ऊर्जा ऑडिट आणि गुणवत्ता ऑडिट ची प्रमाणपत्रे ही सोबत जोडलेल्या नमुन्यांत दिल्याप्रमाणे राहतील. जी ऑडिटची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठाच्या सदर समितीकडून प्रदान करण्यात येतील.

**क) सेवानिहाय कन्सल्टन्सी दरपत्रक**

सदरच्या ऑडिट प्रक्रियेसाठी संबंधीत महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने खालीलप्रमाणे ऑडिट फी, सोबत जोडलेला "ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी फी स्वीकारणेबाबतचा अर्ज" भरून मा. कुलसचिवांच्या पूर्वपरवानगीने विद्यापीठाकडे फी जमा करावी.

| अ.क्र. | ऑडिट / सेवा | फी |
|---|---|---|
| १ | ग्रीन ऑडिट | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| २ | पर्यावरण ऑडिट | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| ३ | ऊर्जा ऑडिट | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| ४ | गुणवत्ता ऑडिट | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| ५ | याव्यतिरिक्त इतर ऑडिट्स | प्रत्येकी रु. ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) |

(टीप – तक्त्यात दिलेल्या ऑडिट / सेवा व्यतिरिक्त इतर आवश्यक ऑडिट (लेखापरीक्षण) सेवांसाठी प्रत्येकी रु. ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) प्रमाणे फी आकारण्यात येईल. या ऑडिट / सेवा व्यतिरिक्त समिती सदस्यांचा प्रत्यक्ष भेटीसाठी होणारा प्रवास खर्च व दैनंदिन भत्ता हा विद्यापीठाच्या प्रवास खर्च व दैनंदिन भत्ता च्या नियमानुसार संबंधीत महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने भेटीच्या प्रत्यक्ष दिवशी सदस्यांस रोख स्वरूपात अदा करणे, अनिवार्य राहील. सदरचा समिती सदस्यांचा प्रत्यक्ष भेटीसाठी होणारा प्रवास व दैनंदिन भत्ता यावरील खर्च हा मूळ ऑडिट / सेवा कन्सल्टन्सी फी व्यतिरिक्तचा खर्च संबंधित महाविद्यालयास / संस्थेस करावयाचा आहे, याची नोंद घ्यावी.)

**ड) समिती सदस्यांच्या कार्यालयीन रजा, सदस्य - कन्सल्टन्सी सेवा फी, प्रवास खर्च, दैनंदिन भत्ता व इतर खर्चाविषयी**

सदरच्या ऑडिट प्रक्रियेसाठी संबंधीत महाविद्यालयास / शैक्षणिक संस्थेस देण्यात येणाऱ्या समिती सदस्यांच्या प्रत्यक्ष भेटींची संख्या तसेच सदर ऑडिट प्रक्रियेची सेवा देणाऱ्या समिती सदस्यांच्या कार्यालयीन रजा, सदस्य सेवा फी, प्रवास खर्च, दैनंदिन भत्ता व इतर खर्चाविषयीची नियमावली खालीलप्रमाणे –

१) सदरच्या ऑडिट प्रक्रियेसाठी विद्यापीठाकडे फी जमा केलेल्या संबंधीत महाविद्यालयास / शैक्षणिक संस्थेस समितीच्या आणि महाविद्यालयाच्या सोयीच्या तारखेस ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती प्रत्यक्ष पाहणी आणि नोंदी घेण्यासाठी भेट देईल.

२) संबंधित सर्व प्रकारचे ऑडिट्स करण्यासाठी लागणारी आवश्यक ती सर्व कागदपत्रे, फोटोग्राफ्स (छायाचित्र), व्हिडीओ, माहिती, आकडेवारी इत्यादी संबंधित संस्थेने / महाविद्यालयाने सदर समितीस विहित वेळेत उपलब्ध करून देणे, अपेक्षित आहे.

३) आवश्यकतेप्रमाणे कमीत कमी एक वेळा आणि जास्तीत जास्त दोन वेळा सदर समिती प्रत्यक्ष भेट देईल.

४) ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती सदस्यांना महाविद्यालयास / शैक्षणिक संस्थेस प्रत्यक्ष भेट देण्याकरीताची रजा ही कार्यालयीन रजा (Official Duty Leave) म्हणून ग्राह्य धरून तशी मान्यता विद्यापीठाच्या संबंधीत प्रशासकीय अधिकाऱ्याकडून प्रदान करण्यात येईल.

५) ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती सदस्यांना, त्यांनी पुरविलेल्या कन्सल्टन्सी सेवेपोटी द्यावयाची रक्कम (सदस्य - कन्सल्टन्सी सेवा फी) ही तीनही सदस्यांना समप्रमाणात विभागणी करून विद्यापीठाच्या कन्सल्टन्सी सेवा धोरणानुसार (As per the University Consultancy Policy), विद्यापीठ अदा करेल. संबंधीत महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने समिती सदस्यांना प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष कोणतेही मानधन अदा करण्याची आवश्यकता नाही (प्रवास खर्च व दैनंदिन भत्ता सोडून). सदरच्या ऑडिट प्रक्रियेसाठी संबंधीत महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने वर तक्त्यात दिलेल्या सेवानिहाय कन्सल्टन्सी दरपत्रकानुसार विद्यापीठाकडे ऑडिट फी भरणे, अनिवार्य असेल.

६) ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समिती सदस्य हे वैयक्तिक / भाडोत्री चार चाकी (कार) वाहनाने संबंधीत महाविद्यालयास / शैक्षणिक संस्थेस प्रत्यक्ष भेट देतील. सदरचा प्रवास खर्च आणि दैनंदिन भत्ता हा विद्यापीठाच्या प्रवास खर्च व दैनंदिन भत्ताच्या नियमानुसार संबंधीत महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने भेटीच्या प्रत्यक्ष दिवशी सदस्यांस रोख स्वरूपात अदा करणे, अनिवार्य राहील. सदरचा समिती सदस्यांचा प्रत्यक्ष भेटीसाठी होणारा प्रवास व दैनंदिन भत्ता यावरील खर्च हा मूळ ऑडिट / सेवा कन्सल्टन्सी फी व्यतिरिक्तचा खर्च संबंधित महाविद्यालयास / संस्थेस करावयाचा आहे, याची नोंद घ्यावी.

७) संबधीत सर्व ऑडिटचा अहवाल आणि प्रमाणपत्र यांची प्रत्येकी एक प्रत (हार्ड कॉपी) समितीकडून संबंधीत महाविद्यालयास / शैक्षणिक संस्थेस प्रदान करण्यात येईल. ते प्रत्यक्षपणे दिले जाईल किंवा भारतीय टपाल सेवेमार्फत पाठविण्यात येईल. याशिवाय अहवाल आणि प्रमाणपत्र यांची पी.डी.एफ. प्रत इ-मेल व्दारे पाठविली जाईल.

८) या ऑडिट प्रक्रियेसाठी विविध प्रकारची स्टेशनरी, फोटोग्राफी, फोटो-प्रिंटींग, अहवाल प्रिंटींग, अहवाल बायडिंग / फाईल, प्रमाणपत्र डिझाईनिंग-प्रिंटींग यावरील खर्च व इतर अनुषांगिक खर्च होणे, अपेक्षित आहे. सदर खर्च हा मा. कुलसचिव कार्यालयाकडून समितीस संबंधीत प्रत्यक्ष खर्चाचे बिल सादर केल्यानंतर अदा केला जाईल.

# ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी फी स्वीकारणेबाबतचा अर्ज

दि.    /    /20

प्रति,
मा. कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र.

विषय - ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समितीकडून महाविद्यालयाचे / शैक्षणिक संस्थेचे ऑडिट करून मिळण्यासाठीची ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी फी स्वीकारणेबाबत...

महोदय,

मी, .................................................................................... (पदनाम - ..........................................)
आपणांस विनंती करतो की, आमच्या ........................................................................ या संस्थेच्या ........................................................................ या महाविद्यालयाचे / शैक्षणिक संस्थेचे, आपल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मान्यता दिलेल्या ग्रीन-पर्यावरण ऑडिट कन्सल्टन्सी समितीकडून ग्रीन-पर्यावरण ऑडिट करून मिळावे. त्यामध्ये खाली नमूद केलेले ऑडिट करून मिळणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | ऑडिट / सेवा | Yes/no | फी |
|---|---|---|---|
| १ | ग्रीन ऑडिट | | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| २ | पर्यावरण ऑडिट | | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| ३ | ऊर्जा ऑडिट | | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| ४ | गुणवत्ता ऑडिट | | रु. ४०००/- (रुपये चार हजार मात्र) |
| इतर ऑडिट | १) | | रु. ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) |
| | २) | | रु. ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) |
| | ३) | | रु. ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) |
| जमा करत असलेली एकूण फी रुपये | | | |

अक्षरी रुपये ........................................................................................ मात्र

त्यासाठीची वर तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, एकूण फी आपल्याकडे जमा करत आहे. तरी कृपया सदर फी जमा करून घ्यावी आणि संबंधित ऑडिट करण्याविषयी पुढील कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

आपला विनीत,

स्वाक्षरी ..........................................
नाव / पदनाम सह शिक्का